ग्रामपंचायत गुढे ता.भोर जि.पुणे

ई-निविदा सूचना -१/२०२६-२७

मौजे गुढे येथे विविध  विकास कामासाठी आवश्यक असणारे  साहित्य पुरविणे बाबत.

---

सरपंच  ग्रामपंचायत गुढे ता.भोर जि.पुणे येथे विविध विकास कामासाठी आवश्यक असणारे  साहित्य ३१/०३/२०२७ पर्यंत खरेदीकरिता ई-निविदा दोन लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | बयाना रक्कम | टेंडर फी |
|---|---|---|---|
| १ | सिमेंट ,क्रश ,खडी,स्टील ,सिमेंट पाईप | १०००/- | २३६/- |
| २. | नळ पाणी पुरवठा व इलेत्रिक साहित्य पुरवणे | १०००/- | २३६/- |

**निविदेच्या अटी व शर्ती**

1. वरील साहित्य खरेदी निविदा प्रकिया ई-निविदा प्रकीयेद्वारे https;//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करणेत येईल तसेच या निविदेबाबत सर्व सूचना इ.या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिद्ध केली जातील
2. पुरवण्यात येणाऱ्या सर्व साहित्याची रॉयल्टी,विक्रीकर,जीएसटी,आयकर व शासनाने इतर उपकार व फी भरायची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील व त्यातील कोणत्याही नियमांचा भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठाधारक स्वत: जबाबदार राहील त्यामुळे BOQ मध्ये साहित्याचे दर सर्व करासहित व जागा पोह्च करणे वाहतूक करणे इ.बाबींचा विचार करून नोंदवावे तसेच निविदाधारकाची कोणत्याही प्रकारची अट किंवा शर्त निविदेमध्ये नमूद नसावी ,सशर्त निविदा स्वीकारली जाणार नाही.
3. मंजूर निविदेतील साहित्याचे दर मंजूर दिनांकापासून १२० दिवसापर्यंत लागू राहतील.बाजारपेठ सदर साहित्याचे दर वाढल्यास दराची वाढीव रक्कम ग्रामपंचायत देणार नाही .
4. निविदा मंजूर झाल्यास पुरवठाधारकास आदेशपत्र देण्यापूर्वी रु.१०० /- च्या स्टंम्प पेपरवर विहित नमुण्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
5. पुरवठाधारकाने ग्रामपंचायतीच्या मागणी नुसार साहित्य पुरवठा करण्यात यावा सदर पुरविलेल्या साहित्याचे देयके निधीचे ग्रामपंचायत निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही.
6. एकच अथवा सर्वच निविदा कारणे न देता अंशत:/संपूर्ण नाकारणेचा अधिकार सरपंच/ग्रामसेवक ग्रा.प. गुढे ता.भोर यांनी राखून ठेवला आहे.त्याप्रमाणे निविदा का नाकारली याचा खुलासा देखील  मागता येणार नाही.
7. पुरवठाधारकाने निविदासुचाने नुसार दिलेल्या वेळेमध्ये साहित्याचा एक नुमना ग्रामपंचायत या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत दाखल करावा.ज्या निविदाधारकाचा नुमना विहित वेळेत दाखल होणार नाही.त्याची पोहोच लिफाफा क्र.१ उघडते वेळी निविदा नाकारण्यात येईल .सदर साहित्याचा नमुना ग्रामपंचायतीमध्ये दिलेल्या कालावधी मध्ये सादर करावयाचा आहे.व त्याची पोहोच निविदेमध्ये उपलोड करणे आवशयक आहे .दरपत्रकात नमूद केलेल्या तपशीलप्रमाणे नमुना देणे बंधनकारक राहील.नमुना न पुरविल्यास निविदा रद्द करणेचा अधिकार ग्रा.प. असतील.तसेच निविदा मंजुरीनंतर नमुन्यानुसार साहित्य न पुरविलेस सदर पुरवठाधारकाची रक्कम देण्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही .
8. गरजेप्रमाणे साहित्य कमी अथवा जादा प्रमाणात उपलब्ध निधी /अनुदानानुसार खरेदी केली जाईल व त्यानुसार देयके अदा केली जातील.
9. निविदेला मंजुरी मिळालेनंतर मालाचा पुरवठा करणेपुर्वी तयार असणारे साहित्य पुरवठादाराने कार्यालय सांगेल त्या दिवशी व त्याठिकाणी दाखविणेस ठेवले पाहिजे व ते नमुन्याप्रमाणे खात्री झाल्यावर मालचा पुरवठा आदेश मिळाल्यावर १५

दिवसाच्या कालावधीत कामच्या ठिकाणी स्व:खर्चाने पोहोच केले पाहिजे.ग्रामपंचायत कार्यालायचे प्रतिनिधी साहित्याची तपासणी करतील व त्यावेळी पुरवठादाराने निकृष्ठ प्रतीचा साहित्याचा पुरवठा केला असेल तर ते साहित्य ग्रामपंचायत स्वीकारणार नाही व यामध्ये पुरवठाधारकाचे नुकसानीस ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. यानंतर साहित्य खरेदीस नवीन निविदा प्रसिद्ध केली जाईल.मुदतीस साहित्य पुरवठा न केलेस प्रती दिन ५००/- दंडाची आकारणी केली जाईल.विलंबाने साहित्य पुरवठा केल्यास दंडाची रकम बिलातून वजा केली जाईल.

10. ज्यांची निविदा मंजूर होणार नाही.त्यांची इसारा /अनामत रक्कम ग्रामपंचायत यांचेकडे मागणी करणे गरजेचे नाही त्यांची रक्कम ऑनलाईन संबधित ज्या बँक खात्यावरून वर्ग झालेली असेल त्या खाती वरती जमा होईल .
11. निविदे बाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत ग्रामपंचायत गुढे ता.भोर जो निर्णय घेईल तो निविदाधारकास बंधनकारक राहील.

- **लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे**

- निविदा फॉर्म फी व इसारा(बयाणा)(EMD) फक्त SBI ONLINE द्वारेच स्वीकारली जाईल.सदरची निविदा फॉर्म फी व बयाणा फी निविदाधारकाने ONLINE निविदा भरताना ONLINE INTERNET BANKING द्वारे भरावी.सदरील विहित नमुन्यातील संबधित SBI ONLINE चा UTR क्रमांक नोंदवून तांत्रिक लिफाफ्या सोबत ऑनलाईन अपलोड करावी.
- आयकर प्रमाणपत्र स्कॅन कॉपी
- पॅन कार्ड स्कॅन केलेली प्रत
- GST रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट स्कॅन कॉपी
- शॉप अक्ट रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र /व्यवसाय ना हरकत प्रमाणपत्र स्कॅन कॉपी
- बंधपत्र संस्थेच्या लेटर हेड वरती

- **लिफाफा क्र.२ मध्ये स्कॅन करून सादर करावयाची कागदपत्रे**
  - BOQ

**वेळापत्रक –**

| **बाब** | **दिनांक(पासून)** | **वेळ** | **दिनांक (पर्यंत)** | **वेळ** |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १५/०५/२०२६ | स ९.०० | २२/०५/२०२६ | दु.४.०० |
| निविदा फोर्म व परिशिष्ट मिळवण्याचा कालावधी(Download) | १५/०५/२०२६ | स ९.०० | २२/०५/२०२६ | दु.४.०० |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | १५/०५/२०२६ | स ९.०० | २२/०५/२०२६ | दु.४.०० |
| ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी | २३/०५/२०२६ | दु.०४.०० | | |

**बंधपत्र**

**कामाचे नाव – ग्रामपंचायतीस विविध विकास कामासाठी लागणारे साहित्य पुरवणे**

मी / आम्ही गांभीर्यापूर्वक नमूद करतो कि मी/आम्ही वर नमूद कलेल्या कामच्या ई निविदेच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या BOQ फाईल नमूद करोत आहोत, जर माझी/ आमची निविदा स्वीकृत करण्यात आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधील राहू या अटी व शातींचा मी/आम्ही भंग केल्यास या निवेदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनिय कार्यवाहीस पात्र राहू याशिवाय माझी /आमची निविदा मंजूर झाल्यास कामासाठी चांगल्या दर्ज्याची साहित्य पुरवठा करण्याची मी/आम्ही हमी देतो

तसेच संकेतस्थळावर ई निविदेच्या ई-लिफाफा क्र १ व क्र २ मध्ये जि आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करत आहे ती सत्य आहेत असे सत्य प्रतिज्ञेवर लिहून देत आहे

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हास मान्य आहेत.

स्थळ –

दिनांक -

निविदाधारकाची सही व शिक्का

नाव –

पत्ता

Signature Not Verified

Digitally signed by SARUBAI SHANKAR DIGHE
Date: 2026.05.14 22:25:11 IST
Location: Maharashtra-MH